सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
डॉ. संतोष परचुरे
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०२२–२३/३९८ दिनांक : ११/०२/२०२३

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित

सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,

विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग, पुणे.

**विषय : महाविद्यालयांमध्ये नि:शुल्क सहज योग कार्यशाळा घेणेबाबत....**
**संदर्भ : उशिसं/२०२३/मवि–१ दि. १२ जानेवारी २०२३ चे पत्र**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, सहजयोग ध्यानधारणेद्वारे विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता व स्मरणशक्ती वाढते, आरोग्य सुधारते, जीवनामध्ये खऱ्या अर्थाने सुख, शांती व समाधान प्राप्त होते. असे नमूद करून सहज योग ध्यान केंद्र महाराष्ट्र यांनी महाराष्ट्र शासन शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) यांना महाविद्यालयांमध्ये सहजयोग कार्यशाळा घेणेबाबत विनंती केलेली आहे. सदर कार्यक्रमात सहजयोग ध्यानधारणेची माहिती देण्यात येणार असून सदर कार्यशाळा सर्वांसाठी विनामूल्य आहे.

महाराष्ट्र शासन शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) यांचे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही या अटीवर व उपलब्ध वेळेनुसार सदर कार्यक्रमाला सहकार्य करण्याबाबतचे परिपत्रक आपल्या अवलोकनार्थ व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

त्यानुसार आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागांमध्ये सहजयोग कार्यशाळेचे आयोजन करण्याबाबत आपण आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी. विद्यार्थी, विद्यार्थी कल्याण अधिकारी, संबंधित शैक्षणिक विभाग यासह आपले महाविद्यालय/परिसंस्थातील उर्वरित शैक्षणिक तथा सह शैक्षणिक विभाग, शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सामूहिक सहभागातून सहयोग कार्यशाळेचे आयोजन करणेबाबत संबंधितांना सूचित करावे. कळावे ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे

(डॉ. संतोष परचुरे)
संचालक,
विद्यार्थी विकास मंडळ

भ्रमणध्वनी : ०९२७२७२७९९९, ०८२७५५१५३५४, ईमेल : sdparchure@gmail.com, bsd@unipune.ac.in
कार्यालय: ०२०–२५६२२६८०, ०२०–२५६२२६८७, संकेतस्थळ : http://www.unipune.ac.in/bsd

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
Web : www.dhepune.gov.in E-mail : mavi.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२२११,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११९५३

क्र.उशिसं /२०२३/संकीर्ण/ मवि-१ दिनांक-१२.०१.२०२३

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण.

**विषय- महाराष्ट्र राज्यातील महाविद्यालयांमध्ये नि:शुल्क सहज योग कार्यशाळा घेणेबाबत.**
**संदर्भ-** सहज योग शिक्षक, सहज योग ध्यान केंद्र महाराष्ट्र यांचे पत्र दि. ०९.११.२०२२

उपरोक्त विषयाच्या संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सहज योग ध्यान केंद्र महाराष्ट्र यांनी महाराष्ट्रातील महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये सहजयोग कार्यशाळा घेणेबाबत विनंती केलेली आहे.

त्यानुसार सहज योग ध्यान केंद्र महाराष्ट्र यांचेकडून विद्यापीठ व महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांसाठी सहजयोग ध्यान धारनेची माहिती देण्यात येणार आहे. सहजयोग ध्यान धारणेद्वारे विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता व स्मरणशक्ती वाढते. सहज योग ध्यानामुळे आरोग्य सुधारते, जीवनामध्ये खऱ्या अर्थाने सुख, शांती व समाधान प्राप्त होते. असे संदर्भांकीत पत्रामध्ये नमूद केले आहे.

सहजयोग ध्यानधारणेची कार्यशाळा सर्वांसाठी विनामूल्य आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही या अटीवर व उपलब्ध वेळेनुसार सदरच्या कार्यक्रमाला सहकार्य करण्याबाबत आपल्या कार्यक्षेतील विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांना सूचीत करण्यात यावे.

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
प्र. शिक्षण संचालक, ( उच्च शिक्षण )
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१.

प्रत-१. स्वीय सहाय्यक , मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय , मुंबई
२.मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, विभाग,मंत्रालय, मुंबई
३. सहजयोग शिक्षक, सहज योग ध्यान केंद्र महाराष्ट्र